## अवतीभवती

### धामणगाव शालेय समितीच्या अध्यक्षपदी बेले

**वसमत :** धामणगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीची निवडणूक एकमताने पार पडली. यामध्ये समितीच्या अध्यक्षपदी बालाजी ज्ञानबा बेले, तर उपाध्यक्षपदी लक्ष्मण भीमराव हरबळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे, शाळेचा सर्वांगीण विकास आणि भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली.यावेळी पदोन्नतीनंतर उच्च श्रेणी मुख्याध्यापक म्हणून रुजू झालेले डी.के. जाधव यांचाही समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी समिती सदस्य विश्वनाथ हरवले, अंगद बेले, पांडुरंग कोचार, सदाशिव बेले, चांदू कोचार, संदीप गायकवाड, तुकाराम भूतकर यांच्यासह ग्रामस्थ बाळूभाऊ हरबळे, विठ्ठल बेले व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. यासाठी शिक्षक पद्मसिंह जाधव, आदेश देशपांडे, मारोती मगर, राजेंद्र साबळे आणि शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले.

### 'ज्ञानसाधना'चे नीट परीक्षेत यश

**परभणी :** धर्मापुरी येथील ज्ञानसाधना नीट ॲन्ड जेईई फाऊंडेशनच्या विद्यार्थ्यांनी रि-नीट परीक्षेत निकालाची परंपरा कायम राखली आहे. वैष्णवी बरबडे (५६०), श्रावणी गायकवाड (५०४), शिवम देवकते (४७६), हर्षदीप कांबळे (४७१), पुजा तळेकर (४४६), राज अंकुर (४३८), राजकुमार तळेकर (४३२), ऋतुजा नलबळे (४२५), कल्याणी बालटकर (४२३), कृष्णा जाधव (३९०), ऋषिता तिळवे (एसटी-२६६), श्रेया दांडेगावकर (एसटी-२५०), आरती दौंड (दिव्यांग-१४१) यांनी गुण प्राप्त करुन यश मिळवले. या यशाबद्दल त्यांचे संस्थाध्यक्ष प्रा. किरण सोनटक्के, सचिव प्रा. शीतल सोनटक्के, समन्वयक एस. डी. धुळे, विभागप्रमुख, परीक्षा विभागप्रमुख, सर्व प्राध्यापकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### पवार महाविद्यालयास 'ओ' मानांकन

**पूर्णा :** येथील स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयाने विद्यापीठाच्या लेखापरीक्षणात शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध करत ७५० पैकी ७३० गुण प्राप्त करून 'ओ' मानांकन प्राप्त केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक व प्रशासकीय लेखा परीक्षण तपासणीमध्ये महाविद्यालयाने गुणवत्ता सिद्ध करत ९७.३३ टक्के गुण प्राप्त केले. विद्यापीठाच्या महालेखा परीक्षण समितीने महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता, प्रशासकीय कामकाज, पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांसाठी राबविले जाणारे सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम, ग्रंथालयातील सेवा, संशोधन क्षेत्रातील कामगिरी अशा विद्यार्थी हिताच्या बाबींचा अभ्यास केला होता. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव तथा प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार, संस्थाध्यक्ष गुलाबराव कदम, कोषाध्यक्ष डॉ. सुनीता काळे-पवार आदींनी प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

### पिके करपू लागल्याने शेतकरी चिंताग्रस्त

**वसमत :** पेरणीनंतर गेल्या वीस दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने कुरुंदा परिसरात खरीपाची पिके करपू लागली असून शेतकऱ्यांत चिंतेचे वातावरण आहे. पावसाअभावी शेतातील ओलावा झपाट्याने कमी होत असल्याने कापूस, सोयाबीन, हळद, इतर पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. काही दिवसांपूर्वी पेरणीयोग्य पाऊस झाल्याने परिसरातील बहुतांश गावांत कापूस, सोयाबीन, हळद आदी पिकांची मोठ्या प्रमाणावर पेरणी करण्यात आली होती. सुरुवातीला जमिनीत पुरेसा ओलावा असल्याने कापूस व सोयाबीनची उगवणही समाधानकारक झाली होती. मात्र अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीनचे बियाणे निकृष्ट दर्जाचे निघाल्याने अपेक्षित उगवण झाली नाही. त्यामुळे अनेकांना अतिरिक्त खर्च करून पुन्हा पेरणी करावी लागली. आता दुसऱ्यांदा उगवलेली पिकेही पावसाअभावी करपू लागल्याने शेतकऱ्यांवर दुहेरी आर्थिक संकट ओढवले आहे. सध्या पिकांना तातडीने पावसाची गरज आहे.

### स्मार्ट मीटरच्या सक्तीला विरोध

**वसमत :** राज्यात स्मार्ट मीटर बसविण्याच्या सक्तीच्या निर्णयाविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आक्रमक झाला असून, हिंगोली येथील महावितरण कार्यालयात प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांच्या उपस्थितीत संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने वीज ग्राहक उपस्थित होते. स्मार्ट मीटरची अंमलबजावणी ही जनतेच्या संमतीशिवाय सक्तीने न करता, जनहित आणि पारदर्शकतेच्या तत्त्वावरच करण्यात यावी, अशी भूमिका निवेदनाद्वारे मांडण्यात आली. कोणताही निर्णय घेताना नागरिकांचा विश्वास संपादन करणे, त्यांच्या मनातील शंका दूर करणे आणि लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.





**सेलू:** समृद्धी महामार्गास जोडल्या जाणाऱ्या जालना-नांदेड द्रुतगती महामार्गासाठी तालुक्यातील वालूर शिवारात बंदोबस्तात जमिनीचा ताबा घेण्यात आला.(दुसऱ्या छायाचित्रात) जमिनीतील कोवळ्या पिकांवर बुलडोझर फिरवताना.

# 'समृद्धी'साठी बंदोबस्तात जमिनीचा ताबा

## सेलू-जिंतूर तालुक्यात अनेक ठिकाणी पिकांवर बुलडोझर ; दोन दिवसांपासून संपादनाची प्रक्रिया होती सुरू

**सेलू, ता.१७ (बातमीदार):** समृद्धी महामार्गास जोडणाऱ्या जालना-नांदेड द्रुतगती महामार्गासाठी सेलू व जिंतूर तालुक्यातील विनासंमती निवाडे (अवॉर्ड) झालेल्या शेतजमिनीचा ताबा गुरुवारी (ता. १६) व शुक्रवारी (ता. १७) बंदोबस्तात घेण्यात आला. दिवसभर चाललेल्या मोहिमेसाठी २० अधिकारी, १५० हून अधिक पोलिस, ४० वाहनांचा मोठा ताफा तैनात होता. पिढ्यान् पिढ्या जगविणाऱ्या जमिनी व त्यावरील मुलाप्रमाणे सांभाळलेल्या कोवळ्या पिकांवर बुलडोझर फिरवल्यावर शेतकऱ्यांनी आक्रोश केला.

गुरुवारी (ता.१६) सकाळी दहाला पथकाने तालुक्यातील गुळखंड (गट क्रमांक ४०, ४८), हट्टा (गट क्रमांक १८, २२, १२५), तांदुळवाडी (गट क्रमांक १०५, १०९, १४९) या गावांतील जमिनीचा ताबा घेतला. शुक्रवारी (ता. १७) वालूर शिवारातील (गट क्रमांक १०, ४३, ४३३, ४३०, ८४, ९, १२, ४३४) येथील शेतजमिनीचा शासनाने ताबा मोन्टेकार्लो लिमिटेड यांना दिला. यावेळी काही भूधारकांनी एकत्र येऊन विरोध करण्याचा प्रयत्न केला; परंतु तहसीलदार डॉ. शिवाजी मगर, नायब तहसीलदार विजय मोरे, उपविभागीय पोलिस अधिकारी दीपककुमार वाघमारे, अनिल विभूते, पोलिस निरीक्षक अरुण नागरे आणि मंडळ अधिकारी सारिका हेडगे, प्रतिभा साखरे यांनी शेतकऱ्यांना समजावले. 'तुमचा मोबदला न्यायालयात जमा केला असून तो कधीही काढता येईल; परंतु आजच्या शासकीय प्रक्रियेत अडथळा आणू नका', अशी भूमिका प्रशासनाने घेतली.



**सेलू :**तुटपुंजी रक्कम देऊन जमिनी हिरावू नका, असे म्हणत ८० वर्षीय गिरजाबाई मुंढे या वृद्धेने टाहो फोडला.

तालुक्यात जवळा जिवाजी, चिकलठाणा बुद्रूक, चिखलठाणा खुर्द, रायपूर या भागांतही आगामी काळात अशाच पद्धतीने ताबा घेतला जाणार आहे.

**कमी मोबदल्यामुळे फोडला टाहो**

■ जमिनीचे मूल्यांकन दर कमी करून तुटपुंजी रक्कम न्यायालयात जमा करून जमिनीवर ताबा घेतल्याने शेतकऱ्यांनी आक्रोश केला. वालूर येथील ८० वर्षांच्या गिरजाबाई साहेबराव मुंढे या वृद्धेने आपली गट क्रमांक १० मधील सर्व जमीन महामार्गात जात असून बागायती जमिनीला कमी भाव मिळत असल्याने टाहो फोडला. मंडळ अधिकारी सारिका हेडगे यांनी त्यांना धीर दिला.

### पावसासाठी मशिदींत विशेष सामुहिक प्रार्थना

**वसमत,ता.१७ (बातमीदार):** जून महिन्यापासून आतापर्यंत समाधानकारक पाऊस न झाल्याने वसमत परिसरातील पिके संकटात सापडली असून खरिपावर दुष्काळाचे सावट गडद होत आहे. पावसाअभावी शेतकरी चिंतेत असून नागरिक व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. या पार्श्वभूमीवर मुस्लिम बांधवांनी पावसासाठी शुक्रवारी (ता.१७) जुम्मा नमाजानंतर शहरातील प्रमुख बेन्जीर जाही मशिदीत ईमाम व खतीब मौलाना इम्रान बरकती यांच्या नेतृत्वाखाली विशेष प्रार्थना करण्यात आली.

यावेळी हजारो मुस्लिम बांधवांनी अल्लाहसमोर हात उंचावून राज्यासह परिसरात भरपूर व समाधानकारक पाऊस पडावा, शेतकऱ्यांचे संकट दूर व्हावे, जनतेला पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे तसेच सर्वांना सुख-समृद्धी लाभावी, अशी प्रार्थना केली. शहरातील इतर अनेक मशिदींमध्येही जुम्मा नमाजानंतर पावसासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. पाऊस लवकरच बरसावा, शेतीला संजीवनी मिळावी, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# जिल्हा परिषदेसमोर घंटानाद आंदोलन

**हिंगोली, ता. १७ (बातमीदार) :** औंढा नागनाथ पंचायत समितीमधील कपातीच्या रकमेत झालेल्या ५७ लाख रुपयांच्या गैरव्यवहारप्रकरणी दोषींवर गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने गुरुवारी (ता. १६) जिल्हा परिषदेसमोर तीव्र घंटानाद आंदोलन करण्यात आले.

लेखा विभागाच्या पथकाने केलेल्या तपासणीत तब्बल ५७ लाख रुपयांचा गैरव्यवहार उघड झाला असून, चार कर्मचाऱ्यांसह गटविकास अधिकाऱ्यांवर यात ठपका ठेवण्यात आला आहे. मात्र, मागील सहा महिन्यांपासून प्रशासनाकडून गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. सेनगाव तालुक्यात अशाच प्रकरणात तातडीने गुन्हे दाखल झाले, मग औंढा नागनाथबाबत दुजाभाव का, असा सवाल पक्षाने उपस्थित केला. विशेष म्हणजे, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी (सीईओ) गुन्हे दाखल करण्याचे आदेश देऊनही कनिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. या पार्श्वभूमीवर प्रशासनाला जागे करण्यासाठी ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, तालुकाप्रमुख माउली झटे, बबनराव इधारे, शंकर घुगे यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हे आंदोलन झाले.

सीईओंच्या आदेशाला केराची टोपली दाखवणाऱ्या दोषींवर तत्काळ गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# आरोपीची शिक्षा जिल्हा न्यायालयातही कायम

**गंगाखेड, ता. १७ (बातमीदार):** विनयभंग प्रकरणातील आरोपीस कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षे सश्रम कारावास, दोन हजार रुपये दंडाची शिक्षा गंगाखेड जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने यांनी कायम ठेवली.

१३ नोव्हेंबर २०१६ रोजी घडलेल्या घटनेप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून पिंपळदरी पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात न्यायालयीन सुनावणीनंतर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये आरोपी मोहन इंदरबुवा गिरी (रा. खोकेवाडी) यास दोन वर्षे सश्रम कारावास व दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती. या निर्णयाविरोधात आरोपीने जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय गंगाखेड येथे अपील दाखल केले. अपिलावरील दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर जिल्हा न्यायाधीश-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांनी कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय योग्य ठरवत आरोपीची शिक्षा कायम ठेवली. या प्रकरणात जिल्हा सरकारी अभियोक्ता डी. यू. दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली एस. डी. वाकोडकर यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली. त्यांना सहायक सरकारी अभियोक्ता एस.बी. पोळ, ॲड. संतोष मुंडे, जे.एच. पठाण , एस. एस. जिंकलवाड, एम.डी. कुंडगीर, श्रीमती एल.व्ही. मुंडे यांच्यासह गंगाखेड न्यायालयातील कर्मचारी व कोर्ट पैरवीकारांचे सहकार्य लाभले.

# पिकांना जीवदान; शेतकऱ्यांत समाधान

## हिंगोली जिल्ह्यात दमदार पावसाच्या हजेरीमुळे दिलासा

**हिंगोली, ता. १७ (बातमीदार) :** गेल्या काही दिवसांपासून उकाडा आणि दमट वातावरणाने हैराण झालेल्या हिंगोलीकरांना गुरुवारी दुपारनंतर झालेल्या पावसाने मोठा दिलासा मिळाला. शहरासह जिल्ह्यातील अनेक भागांत मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस झाल्याने वातावरण आल्हाददायक झाले असून, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

दुपारनंतर अचानक आकाशात ढग दाटून आले आणि काही वेळातच पावसाला सुरवात झाली. पावसामुळे शहरातील तापमानात लक्षणीय घट झाली, तर नागरिकांनाही उकाड्यापासून दिलासा मिळाला. काही ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचले असले तरी पावसाचे नागरिकांनी स्वागत केले.

दरम्यान, हवामान अनुकूल राहिल्यास खरीप हंगामातील उत्पादनात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या पावसाकडे शेतकरी आशेच्या नजरेने पाहत असून, आगामी काही दिवसांतही समाधानकारक पाऊस होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**खरीप पिकांना नवसंजीवनी**

■ ग्रामीण भागात या पावसाचा खरीप पिकांना मोठा फायदा होणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. जिल्ह्यात सध्या सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आदी पिके वाढीच्या टप्प्यात असून, वेळेवर झालेल्या या पावसामुळे पिकांच्या वाढीस चालना मिळणार आहे. तसेच जमिनीतील ओलावा टिकून राहणार असल्याने पुढील काही दिवस पिकांना पोषक वातावरण मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. गुरुवारी झालेल्या पावसामुळे ही चिंता काही प्रमाणात दूर झाली असून पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे.



### वडगाव मावळात 'ग्राहक पंचायत'चा अभ्यासवर्ग

**हिंगोली, ता. १७ (बातमीदार) :** ग्राहकतीर्थ वंदनीय बिंदुमाधव जोशी यांनी मांडलेल्या 'ग्राहक देवो भव' या संकल्पनेतून कार्य करणाऱ्या 'ग्राहक पंचायत महाराष्ट्र' संस्थेचा राज्यस्तरीय अभ्यासवर्ग येत्या ८ व ९ ऑगस्ट २०२६ रोजी पुणे जिल्ह्यातील वडगाव मावळ येथे आयोजित करण्यात आला आहे.

या दोन दिवसीय अभ्यासवर्गाचे नियोजन अंतिम टप्प्यात असून, राज्यभरातील कार्यकर्त्यांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे राज्याध्यक्ष डॉ. विजय लाड यांनी केले आहे. हिंगोली येथे पत्रकार डॉ. विजय निलावार यांच्या निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. याप्रसंगी राज्य महासचिव अरुण वाघमारे आणि विभागीय संघटक बालाजी लांडगे यांच्यासह उपस्थित होते.

# दुमदुमणार 'हरे कृष्ण'चा जयघोष

## इस्कॉनचा जगन्नाथ रथयात्रा महोत्सव उद्या

**हिंगोली, ता. १७ (बातमीदार) :** आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) हिंगोली शाखेच्या वतीने रविवारी (ता. १९) भव्य श्री जगन्नाथ रथयात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन इस्कॉन हिंगोली शाखेने केले आहे.

या महोत्सवामध्ये मुंबई येथील इस्कॉन चौपाटीचे वरिष्ठ कथाव्यास श्रीमान रुद्रनाथ प्रभूजी यांचे विशेष प्रवचन, तर श्रीमान अभय गोपाल प्रभूजी यांचे मधुर हरिनाम संकीर्तन होणार आहे. रविवार सकाळी साडेनऊला अंबिका टॉकीजजवळील श्री संकटमोचन हनुमान मंदिरातून 'हरे कृष्ण'च्या जयघोषात रथयात्रेला प्रारंभ होईल. ही रथयात्रा गांधी चौक, इंदिरा गांधी चौक आणि जवाहर रोडमार्गे श्री बद्रीनारायण मंदिरात पोचेल. तेथे सांस्कृतिक कार्यक्रम व महाप्रसाद वितरण केले जाईल. हिंगोली इस्कॉन परिवार गेल्या महिनाभरापासून या सोहळ्याच्या तयारीसाठी परिश्रम घेत असून, नागरिकांनी या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**इस्कॉनचे भव्य मंदिर उभारणार**

■ हिंगोलीत इस्कॉनचे भव्य मंदिर उभारण्यासाठी नागपूर येथील प्रसिद्ध उद्योगपती व इस्कॉन साधक धनराज खंडेलवाल यांनी लोकसहभागातून नियोजन व सक्रिय सहकार्य करण्याचे अभिवचन दिले आहे. हिंगोली इस्कॉन शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी खंडेलवाल ज्वेलर्स येथे त्यांची भेट घेऊन निमंत्रण दिले.

### 'वनामकृवि' त आज उद्योग-शैक्षणिक संवाद

**परभणी, ता. १७ :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, चेंबर फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ स्मॉल ॲंड मिडियम बिझनेसेस आणि सेवा भारती देवगिरीच्या वतीने शनिवारी (ता.१८) सकाळी अकरा वाजता उद्योग-शैक्षणिक संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील सिम्पोझियम हॉल येथे उद्योग–शैक्षणिक संवाद हा कार्यक्रम ''उद्यम-विकसित मराठवाडा मिशन'' अंतर्गत आयोजित करण्यात येत असून ''विकसित भारत-विकसित महाराष्ट्र - विकसित मराठवाडा'' या संकल्पनेवर आधारित चेंबर फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ स्मॉल ॲंड मिडियम बिझनेसेसच्या प्रादेशिक विकास अभियानाचा तो महत्त्वाचा भाग आहे. ''आत्मनिर्भर मराठवाडा २०३०'' हे या मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमास पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

## निधन



### गंगाधर सोनटक्के

पूर्णा : शहरातील ज्येष्ठ नागरिक गंगाधर रंगनाथराव सोनटक्के (वय ८२) यांचे गुरुवारी (ता. १६) निधन झाले. त्यांच्यावर येथील हिंदू स्मशानभूमीत सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अभिनव विद्या विहार प्रशालेतील शिक्षक अमोलचंद सोनटक्के व व्यावसायिक नेमीचंद सोनटक्के यांचे ते वडिल होत.

### रोमान खान दुर्राणी

**पाथरी :** येथील रहिवासी रोमान अब्दुल रहेमान खान दुर्राणी (वय ६७) यांचे दीर्घ आजाराने बुधवारी (ता. १५) छत्रपती संभाजीनगर येथे निधन झाले. आशियाना फार्म हाऊसवरील कब्रस्तानात दफनविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात मुलगा माजी नगराध्यक्ष तबरेज खान दुर्राणी, दोन मुली, जावई, सून व नातवंडे असा परिवार आहे. माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांच्या त्या भावजय होत.



### धोंडोपंत कानशुक्ले

**परभणी :** रामपुरी रत्नेश्वर (ता.पाथरी) धोंडोपंत तुळशीदास कानशुक्ले (वय ९०) यांचे गुरुवार (ता.१६) छत्रपती संभाजीनगर येथे निधन झाले. गावातील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. बालाजी कानशुक्ले यांचे ते वडील होत.

# गंगाखेडमधून सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा

**गंगाखेड, ता. १७ (बातमीदार) :** नीट व टीईटी परीक्षांमधील पेपरफुटी प्रकरणामुळे लाखो विद्यार्थी व शिक्षकांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. तसेच लडाखचे सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांनी दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा देत केंद्र सरकारने तातडीने त्यांच्याशी चर्चा करावी, अशा मागणीचे निवेदन जागरूक नागरिक आघाडीच्या वतीने तहसीलदारांमार्फत राष्ट्रपतींकडे शुक्रवारी (ता.१७) देण्यात आले.

निवेदनात म्हटले, की नीट व टीईटी पेपरफुटीच्या घटनांमुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत असून संपूर्ण परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. त्यामुळे या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करून परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणावी. तसेच संबंधित केंद्रीय मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा. तसेच सोनम वांगचुक यांच्या उपोषणाकडे दुर्लक्ष करणे हे लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही. त्यांच्या रास्त मागण्यांवर केंद्र सरकारने संवेदनशीलतेने विचार करावा. उपोषणामुळे त्यांच्या प्रकृतीवर परिणाम होत असल्याने तातडीने चर्चा करून त्यांचे उपोषण सन्मानपूर्वक सोडवावे. परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शक व विश्वासार्ह करण्यासाठी ठोस पावले उचलावीत. निवेदनावर ओंकार पवार, श्रीकांत भोसले, प्रसाद गोरे, सुरेश इखे, शंकर पवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.


**महाराष्ट्र ग्रामीण बँक**
**MAHARASHTRA GRAMIN BANK**
शासकीय मालकीची शेड्युल्ड बँक Scheduled Bank Owned by Government

**ई-लिलाव व विक्री सूचना**

**मुख्य कार्यालय :** प्लॉट क्र. ४२, गट क्र. ३३, (भाग), गोलवाडी गाव, ग्रोथ सेंटर, वाळूज महानगर –IV, सिडको, छत्रपती संभाजीनगर–४३११३६

**क्षेत्रिय कार्यालय :** परभणी

खालील सही करणार प्राधिकृत अधिकारी यांनी परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचा सेक्युरीटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांसियल ॲसेटस, ॲण्ड एन्फोर्समेट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तहत प्रदान अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी आणि खालील कर्जदार /तारणकर्ता यांचे संरक्षित मालमत्तेच्या घेतलेल्या ताब्याला अनुसरून, सर्व जनतेस व संबधीत कर्जदार/ तारणकर्ता व जर त्यांचे कायदेशीर वारसदार असतील तर त्यांचेसह सर्व संबधीतास कळविण्यात येते की, खाली नमूद मालमत्तेच्या खरेदीसाठी बँकेकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.त्यामुळे, बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांनी उपरोक्त कायद्याचे नियम ८ व ९ नुसार खालील मालमत्ता '**जशी आहे जेथे आहे तशी**' व '**जी काय आहे तशी**' या तत्वावर ऑनलाईन जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँक हे संरक्षित ऋणको आहेत, त्यामुळे कर्जदाराचे /भागीदाराचे इतर कोणत्याही ऋणकोचे प्रलंबित वाद हे लिलावाद्वारे खरेदी केलेल्या मिळकतीमध्ये तसेच खरेदीदाराचे हक्क यास प्रभावित करू शकणार नाहीत. तसेच विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेवर कोणत्याही कोर्टाची स्थगिती (Stay) नाही.

| अ. क्र. | कर्जदारचे/ जामीनदाराचे नाव व पत्ता, शाखेचे नाव व कर्जखाते क्रं. | मालमत्तेचा तपशील (चतु:सिमेसहित) | विक्री केली जात असलेल्या मालमत्तेची थकीत रक्कम | आरक्षित किंमत रु. / ईसार जमा राशी रु. / बोली रक्कमेतील किमान वाढ रु. | प्रतक्ष्य ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १) | **कर्जदार:** **आदित्य प्रोविजन जनरल स्टोर्स** **प्रो. श्रीमती शितल विजय गायकवाड** मु. पो. भीमनगर, पूर्णा, ता. पूर्णा, जि. परभणी – ४३१५११ **जामीनदार : १. श्री. राजेश नथूलाल सेन** रा. बसवेश्वर चौक, ता. पूर्णा, जि. परभणी –४३१५११ **२.श्री. युवराज शंकर कांबळे** रा. बरबडी पो. लोखंडे पिंपळा ता. पूर्णा, जि. परभणी –४३१५११ **शाखा- पूर्णा** **कर्ज खाते क्रं.:- ८००५१०२४२४३** | घर क्रं. ३–८–९२, सर्वे क्रं. १८८ क्षेत्रफळ:४३५६ चौ.फु. पूर्णा ता. पूर्णा जि. परभणी **चतु:सीमा:** पूर्व: विश्वनाथ गंगाधर अहिरे पश्चिम: वैजनाथ यमाजी नारायणकर उत्तर: रोड दक्षिण: दिलीप किशनराव गायकवाड **प्रॉपर्टी आयडी:** MAHG80051024243 | दि. १५/०५/२०२१ वरील रु. ४८०९६४/– + दि. ०१/१०/२०१९ पासूनचे प्रलंबित व्याज व इतर खर्च | रु. ५,३३,०००/- / रु. ५३,३००/- / रु. १०,०००/- | १५/०२/२०२४ |

**केवायसी व अनामत रक्कम जमा करण्याचा दिनांक व वेळ: १७/०८/२०२६;** सायंकाळी ५:०० पर्यंत

**मालमत्ता निरीक्षणाचा दिनांक व वेळ : १६/०८/२०२६;** सायंकाळी: ५:०० पर्यंत

**लिलावाचा दिनांक व वेळ (५ मिनिटांच्या वाढीव वेळेनुसार, जर शेवटच्या ५ मिनिटांत बोली लावली असेल तर) : १८/०८/२०२६ :** सकाळी ११:०० ते दुपारी १:३० पर्यंत

**अटी व शर्ती - १)** लिलाव ऑनलाइन पद्धतीने https://baanknet.com या संकेतस्थळावर निश्चित केलेल्या दिवशी होईल. शेवटच्या ५ मिनिटांत बोली आल्यास लिलाव आपोआप ५ मिनिटांनी वाढवला जाईल. **२)** बोलीदारांनी https://baanknet.com या वेबसाईटवर नोंदणी करावी लागेल आणि अनामत रक्कम (Earnest Money Deposit) लिलावा आधी भरावी लागेल. ही रक्कम बँकेकडे जमा होऊन वेबसाईटवर अपडेट होईपर्यंत थोडा वेळ लागू शकतो. म्हणून लिलावाच्या कमीत कमी २४ तास आधी अनामत रक्कम भरावी.३) सविस्तर अटी व शर्तींसाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वेबसाईटवर व https://baanknet.com या वेबसाईटवर दिलेल्या लिंक्स बघाव्यात. तसेच पुढील अधिकार्यांशी संपर्क साधावा: **१) श्री प्रवीण वि. सोनवळकर**, अधिकृत अधिकारी/ क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, परभणी. **मोबाइल क्रं. ८३८०८५४९११, ईमेल:**rmparbhani@mahagramin.co.in **२) श्री. यादव गणपत भुंबार, शाखा व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा-पूर्णा, मो.क्र.९७६७५८८५११, ३)श्री. दर्शन किशोरसिंग ठाकुर** , वसूली अधिकारी क्षेत्रीयकार्यालय, परभणी, **मोबाइल क्रं. ८४२१५६४८४९, ४) श्री. उदय जाधव, मोबाइल क्रं. ९८२०८७८२५५ ईमेल:** uday.jadhav@psballiance.com ५) हेल्पलाइन क्रं. ८२९१२२०२२० आणि ईमेल: support.baanknet@psballiance.com **४)** यशस्वी बोलीदारास खरेदी रक्कमेपैकी २५% (अनामत रक्कम सहित) रक्कम लगेच जमा करावी लागेल आणि उरलेली रक्कम १५ दिवसांच्याआत भरावी लागेल. **५)** बोली आरक्षित किमतीपेक्षा जास्त असावी आणि पुढील बोली किमान रू. १०,००० च्या पटीत वाढवावी लागेल. **६)** ज्या बोलीदारांची बोली यशस्वी ठरलेली नाही, अशा बोलीदारांचा अनामत ठेव रक्कम लिलाव प्रक्रिया संपल्या नंतर परत केली जाईल. ७) लिलाव बँकेच्या मंजुरीवर अवलंबून आहे. कर्जदाराने बँकेकडे पूर्ण थकबाकी भरल्यास लिलाव रद्द केला जाऊ शकतो. **८)** मालमत्ता ''जशी आहे तशी' आणि ''जे आहे ते'' या तत्वावर विकली आहे. बोलीदारांनी मालमत्तेबाबत स्वत: चौकशी करावी, त्यावरील कोणतेही दावा/ खर्च बँकेशिवाय असतील तर त्यास बँक जबाबदार नाही. **९)** बँकेला कोणतीही बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार आहे. ती लिलाव रद्द/स्थगित/परिवर्तीत करू शकते. **१०)** खरेदीदाराने सर्व शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, कर आणि ईतर खर्च स्वत: भरावेत. विक्री प्रमाणपत्र फक्त यशस्वी बोलीदाराच्या नावावरच दिले जाईल. **११)** मालमत्तेची पाहणी इएच्छुकांनी स्वतःच्या खर्चाने करू शकतात, पण यासाठी वरील संपर्क व्यक्तींशी पूर्व नियोजित वेळ घेऊन भेट द्यावी. **१२)**लिलाव ''सरफेसी कायदा २००२'' अंतर्गत होणार आहे, व वरील अटींचे पालन बंधनकारक आहे.

**दिनांक : १८/०७/२०२६**
**ठिकाण : परभणी**

**टिप : स्वैर भाषांतर, तफावत आढळल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य**

**प्राधिकृत अधिकारी / क्षेत्रिय व्यवस्थापक,**
**महाराष्ट्र ग्रामीण बँक, क्षेत्रिय कार्यालय : परभणी**